ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 8 | ISSUE - 7 | MARCH - 2022

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# कन्नड तालुक्यातील दुर्लक्षित स्वातंत्र्य सेनानी




**डॉ. भेलोंडे जगदीश व्यंकटराव**
इतिहास विभाग प्रमुख, शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

## प्रस्तावना

हैद्राबाद मुक्ति संग्राम हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील शेवटचे व महत्वपूर्ण पर्व होते. 15 ऑगस्ट 1947 रोजी ब्रिटीशांच्या जुलमी राजवटीतून ब्रिटीश साम्राज्यांतर्गत असलेला भारत स्वतंत्र झाला.यावेळी भारतामध्ये ब्रिटिशराज्या व्यतिरिक्त जवळपास साडेपाचशेच्यावर संस्थाने ही स्वतंत्र होती. यापैकी अनेक संस्थानांनी भारतीय संघराज्यात सामील होणे पसंत केले. हैदराबाद संस्थानात 80 टक्के जनता ही हिंदू असून येथे निजामाची सत्ता होती. जुलमी व अन्यायी राजवटीमध्ये येथील जनता जीवन जगत होती. ब्रिटिश अंमलाखालील भागात स्वातंत्र्यासाठी संघर्ष सुरू असताना त्याचे लोन हैदराबाद संस्थानातही आले. निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्ध व आपल्या हक्कासाठी येथील सुशिक्षित तरुणांनी विविध संघटनांच्या माध्यमातून लढा उभारला. निजाम व कासीम रझवीच्या रझाकार संघटनेने सनदशीर मार्गाने होणारे आंदोलन चिरडून टाकण्याबरोबरच रझाकार संघटनेकडून संस्थानातील प्रजेवर अनन्वित छळ केला जात होता. संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न ज्या वेळेस निर्माण झाला त्यावेळेस निजामाने स्वतःचे राज्य स्वतंत्र ठेवण्याची भूमिका घेतली जी प्रादेशिकदृष्ठ्य स्वतंत्र भारताच्या दृष्ठिणे हिताचे नव्हते. स्वतंत्र भारत सरकारने पोलीस कार्यवाही करून निजामाच्या जोखडातून संस्थानातील प्रजेला मुक्त केले. तत्पूर्वी संस्थानामध्ये उभारलेल्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये मराठवाड्यातील स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, श्यामराव बोधनकर यासारख्या असंख्य जणांनी नेतृत्व केले. पोलिस कार्यवाही व विविध विचारसरणीतुन दिलेल्या लढ्यामुळे निजामाच्या जुलमी जोखडातून हैदराबाद संस्थान स्वतंत्र झाला.

हैदराबाद मुक्तिसंग्रामामध्ये संस्थानातील सर्वच भागातून निजामाच्या विरोधात संघर्ष उभारला होता. प्रारंभी सविनय मार्गाने चळवळीला सुरुवात झाली होती. हैदराबाद प्रमाणेच औरंगाबाद हे निजामाच्या सत्तेचे महत्त्वाचे केंद्र होते. औरंगाबाद हे राजधानी पासून दूर असलेला भाग असल्यामुळे निजामाने विशेष लक्ष या भागाकडे दिलेले होते. मराठवाड्यामध्ये निजामाच्या विरुद्ध उभारलेल्या चळवळीचे औरंगाबाद हे महत्त्वाचे केंद्र होते. विद्यार्थी चळवळ वंदे मातरम चळवळ यासारख्या चळवळी औरंगाबाद येथून सविनय मार्गाने सुरू झाल्या होत्या. निजामाच्या अधिकाऱ्यांनी सविनय मार्गाने सुरू झालेल्या चळवळी दडपशाही मार्गाने दडपून टाकल्या.

कन्नड हे औरंगाबाद जिल्ह्यातील महत्वाचे ठिकाण होते. निजामकालीन तालुक्याचे ठिकाण असलेले कन्नड हे निजामाच्या राज्याचे शेवटचे तालुक्याचे ठिकाण होते. कन्नड तालुक्यातील बराच भाग हा ब्रिटिश

राजवटीत होता. त्यामुळे निजामाच्या राजवटीस लागूनच ब्रिटिशांचे राज्य होते. कन्नड तालुक्यातील शिवना नदीच्या एका बाजूची साडेबारा गावे ब्रिटिश अंमलाखाली होती तर शिवना नदीच्या दुसऱ्या बाजूला निजामाचे राज्य होते. निजामाच्या संस्थानातील इतर भागाप्रमाणे कन्नड तालुक्यातही निजामाच्या अधिकाऱ्यांकडून अनन्वित अत्याचार होत होते. कासिम रझवीच्या रझाकार सैन्याने या परिसरात हैदोस घातला होता. कन्नड येथे राहत असलेल्या चाऊस या निजामाच्या अधिकाऱ्याकडून तालुक्यातील प्रजेवर अन्याय-अत्याचार होत होता. या अन्यायी व अत्याचारी राजवटीचा कन्नड तालुक्यातील प्रजेकडून प्रतिकार केला जात होता. कन्नड तालुक्यातील निजामाच्या विरोधात उभारण्यात आलेल्या चळवळीचे नेतृत्व कर्मवीर काकासाहेब देशमुख यांनी केले. काकासाहेब देशमुखांबरोबर तालुक्यातील अनेकांनी या चळवळीत महत्त्वपूर्ण भूमिका घेतली होती. गावागावातून या चळवळीचे नेतृत्व उदयाला आले होते.

कन्नड शहरामध्ये टिळक स्मारकाच्या ठिकाणी मराठवाडा मुक्ती संग्रामामध्ये सहभाग घेतलेल्या तालुक्यातील स्वातंत्र्य सेनानींच्या नावाचे मराठवाडा मुक्ति संग्राम दिन 17 सप्टेंबर 1948 शिलालेख[1] उभारण्यात आले आहे. त्यामध्ये काकासाहेब देशमुख मिश्रीलाल पहाडे, नाना मो. पाटील, किसनसिंग राजपूत, भगवानसिंग हजारी, भगवंतराव पवार, यादवराव मा. ठोणे, जेबाज खाँ, देवराव वाघ, फकीरा सां.सुरडकर, भास्कर वि. ठाकरे, नारायण ख. देशमुख, गोविंद देव, कल्याणमल पाटणी, भास्करराव देशमुख, दगडूसिंग घ.राजपूत, बाळासाहेब शि.मोरे, दिगंबर सां. कुलकर्णी, वसंतराव मा. देशमुख, वसंतराव गो.निभोनकर, मदनलाल उपाध्ये या सर्व स्वातंत्र्य सेनानीची नावे देण्यात आली आहेत. याशिवाय अनेकांनी या स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वपूर्ण भूमिका घेऊन निजामाच्या दडपशाहीचा प्रतिकार केला होता. प्रत्यक्ष सहभाग घेतलेल्या अनेक स्वातंत्र्य सेनानींचा उल्लेख तर कुठेच मिळत नाही. कांही स्वातंत्र्य सेनानींचा उल्लेख मिळतो परंतु त्यांच्या विषयीची सविस्तर माहिती मिळत नाही असे असले तरी येथील चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या काकासाहेब देशमुखांविषयीची माहिती सविस्तर स्वरुपात मिळते. काकासाहेब देशमुखांच्या कार्याचा ठसा आजही समाजमनावर आहे. त्यांच्या जीवन व कार्याची माहिती "लोकराजा –मराठवाडा मुक्तिसंग्रामातील सशस्त्र क्रांतीचा नेता"[2] या ग्रंथा मध्ये अच्युत वि.भोसले यांनी संकलित केली आहे. या ग्रंथात त्यांनी काकासाहेबांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या कन्नड तालुक्यातील जवळपास साडेचारशे जणांची नावे गावासह दिली आहेत. याशिवाय अनेक अज्ञात स्वातंत्र्य सेनानी असावेत ज्याची नावे कुठेच आढळत नाहीत. मुक्ति संग्रामानंतर कन्नड तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलाखतीसाठी गौरव समितीचे अध्यक्ष श्री. पंडित ज्ञानेंद्र शर्माजी[3] यांनी ज्यांच्या मुलाखती घेतल्या होत्या त्यामध्ये बाजीराव तोताराम जाधव, सखाराम सुपडाची ढहाके, बाबू भिका मढेकर, रामभाऊ बाळा मोकासे, ठकाजी गोबराजी हरणकाळ-पिशोर, तेजराव माधवराव भोसले, भिका संपत भोसले, धोंडीबा हारसिंग भोसले, जनाबाई पांडुरंग सुस्ते, कचरू रघुनाथ देशमुख-आडगाव, धरमचंद जवारमल जैन-हातनूर, तेजराव भोजराज पवार-खातखेडा, हिरा रामदास राठोड-भारंबातांडा, विनायक दगडू पवार-धामणी, यादवराव लहणू तायडे, लक्ष्मीबाई भिकन तायडे, बाबू ठकाजी आगदाळे, प्रतापसिंग दरबारसिंग राजपूत, विठ्ठल पाटीलबा सोन्ने, सीताराम गोविंदा बागुल-नागापूर, गणेशलाल मन्नुलाल परदेशी-चिंचोली, सांडू सर्जेराव पवार, किसन सदाशिव केवट-करंजखेडा, रावसाहेब शामराव देशमुख, रावसाहेब जीवन देशमुख-घाटशेंद्रा, म्हाळसूबा बाळा चोंधे-मोहर्डा, नेमीचंद फुलचंद पाटणी, मिठ्ठू गवनाजी मुळे, पांडुरंग बंडू लोखंडे-वासडी, शंकर त्र्यंबक न्हावी-नेवपूर, पुंजाजी भागाजी सपकाळ- टाकळीअंतुर, कचरूबाई नारायण केवट, रूपचंद मास्तर-कन्नड, मन्साराम येडू सोळुंके-चिमणापूर, देवराव पाटील मनगटे, कचरू नारायण मनगटे-वाकोद, शंकर दगडू घुगे, देवराव आश्रुबा घुगे, कडूबा

पाटीलबा घुगे, सांडू रावजी घुगे, कारभारी मिठू घुगे, मालनबाई तुकाराम घुगे, कचरू राजाराम घुगे, लिंबाजी अहिलाजी घुगे- मेहेगाव, बंडू येडू चव्हाण-दिगाव, त्र्यंबक आनंदा काळे, दौलत भाऊराव साळुंखे, त्रिंबक रामराव आग्रे, रामकृष्ण तात्याराव जाधव-पळसी, शेषराव छगनराव घाडगे-सावखेडा या ५१ जणांची नावे दिली आहेत.

वरील यादीतील बाजीराव जाधव, सखाराम सुपडाजी डहाके राहणार पिशोर व नेमीचंद फुलचंद पाटणी राहणार वासडी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन तत्कालीन परिस्थितीविषयी व त्यांच्या कार्या विषयीची काही माहिती मिळवलेली आहे. त्याचबरोबर स्वातंत्र्य सेनानी दि. सा. कुलकर्णी यांची माहिती त्यांच्या कुटुंबाच्या संग्रही असलेल्या कांही कागदपत्राच्या माध्यमातून मिळवलेली आहे. त्याच्या कार्याची दखल आज पर्यंत घेण्यात आलेली नाही अशा या दुर्लक्षित स्वातंत्र्य सेनानीची व त्यांच्या कार्याची माहिती त्यांच्याशी झालेल्या मुलाखतीच्या माध्यमातून जाणून घेऊन या शोध निबंधाच्या माध्यमातून देण्यात आली आहे.

**नेमीचंद फुलचंद पाटणी**[४] यांचा जन्म कन्नड तालुक्यातील वासडी येथे इसवी सन 1924 मध्ये झाला. गावामध्ये शिक्षण देण्यासाठी निजाम सरकारची शाळा होती त्या शाळेतून उर्दू माध्यमातून शिक्षण दिले जात होते. वतन हे हमारा या प्रमाणे निजामाला अनुकूल अशा प्रकारची प्रार्थना शाळेत म्हटल्या जात होती. शाळेत शिक्षक हे मुस्लिमच होते अशा या शाळेमध्ये चौथीपर्यंत शिक्षण नेमीचंद पाटणी यांनी घेतले आहे.

निजामाच्या अधिकाऱ्याकडून धार्मिक छळ केला जात होता याची माहिती देत असताना नेमीचंद पाटणी यांनी एक प्रकरण सांगितले एका अधिकाऱ्यांने गावातील मंदिरामध्ये घंटा वाजू नये अशा प्रकारचा आदेश दिला होता. घंटा वाजल्यामुळे निजामाच्या अधिकाऱ्यांनी मूर्तीवर पाय देऊन घंटा काढून घेतली व हिंदूंच्या भावना दुखावल्या या सारखे छळ निजामाच्या अधिकाऱ्याकडून होत असत. नेमीचंद पाटणी यांचे सहकारी त्रंबक व यशवंता विठोबा या सहकाऱ्यांना निजामाच्या अधिकाऱ्यांकडून मारहाण झाली होती. निजामाविरुद्ध संस्थानात आर्यसमाज, कम्युनिस्ट पार्टी, काँग्रेस या संघटनांकडून विरोध केला जात होता. नेमीचंद फुलचंद पाटणी यांनी इ. स. 1946 ला काँग्रेसचे सभासद होऊन सक्रिय सहभाग घेतला.

दिघी बॉर्डर कॅम्पचे प्रमुख मिश्रीलाल पहाडे यांच्या प्रेरणेने त्यांनी मुक्तिसंग्राम मध्ये सहभाग घेतला होता. माणिकचंद पहाडे यांच्या गुलमंडी वरील सभेमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. मिश्रीलाल पहाडी यांच्या नेतृत्वाखाली बॉर्डर कॅम्प उभारण्यात आला होता त्यामध्ये यांनी सहाय्यक म्हणून कार्य केले. दिघी कॅम्पमध्ये सहाय्यक म्हणून ते सहभागी झाले होते याची कॅम्पप्रमुख मिश्रीलाल पहाडे यांनी गोविंद भाई श्रॉफ यांना 7 जून 1984 रोजी दिलेल्या अहवालात[५] यांची नोंद आहे. या कॅम्पमध्ये नाना पाटील, दगडू सिंग व गुलाबचंद बन्सीलाल हे ही सहभागी झाले होते अशी माहिती पाटणी यांनी दिली. 17 ऑगस्ट 1948 रोजी सागगव्हाण चेक नाका जाळन्यामध्ये यांनी सहभाग नोंदवला होता त्याच बरोबर 30 ऑगस्ट 1948 रोजी नागापूरचे पोलीस ठाणे उध्वस्त करून तेथील प्रशासन व्यवस्था नष्ट करून गावामध्ये स्वराज्याची स्थापना केली. दिघी कॅम्प बावीस दिवस चालल्याची माहितीही श्री. पाटणी यांनी दिली.

हैदराबाद मुक्ति संग्रामाबरोबच नाट्यस्पर्धा, राजकीय कार्यात (शंकरराव चव्हाण यांचे कार्यक्रमामध्ये सहभाग), सामाजिक  व धार्मिक कार्यक्रमांमध्ये ते सहभाग नोंदवत असत. महाराष्ट्र सरकारने त्यांच्या कार्याची स्वातंत्र्यसेनानी म्हणून नोंद घेऊन त्यांना कशा प्रकारे मानधनही दरमहा दिल्या जात होते.

**स्वातंत्र्य सेनानी: दी. सा. कुलकर्णी** बनशेन्द्रा हे गावं अहमदनगरच्या निझामशाहीकडून मुघल व मराठ्यांकडे आणि पुढे ब्रिटिशांकडे गेले. हैद्राबादच्या निजामाच्या सरहद्दीवर असल्यामुळे निजाम राजवटीशी या गावाचा संबंध नसला तरी मराठवाडा मुक्तिसंग्राम चळवळीत या गावाचा व गावातील अनेकांचा सहभाग

राहिलेला आहे. त्यामध्ये सक्रिय सहभाग असलेले दी.सा. कुलकर्णी हे एक स्वातंत्र्य सेनानी होते. कन्नड तालुक्यातील स्वातंत्र्य सेनानीच्या यादीत दी. सा. कुलकर्णी यांचे नाव आहे. शिवाय मुक्ति संग्राम स्मारकावरही त्यांचे नाव आहे. स्वात्ंत्र संग्रामातील त्यांच्या योगदाना बद्दल 1988 मध्ये प्रधानमंत्री राजीव गांधी यांनी त्यांना ताम्रपत्र भेट दिले आहे.

सन 1961 मध्ये आयुर्वेद व युनानीचे महाराष्ट्र बोर्डाने प्रमाणपत्र दिले आहे. वन औषधींनी लोकांचे रोग ते दूर करीत असल्यामुळे लोक त्यांना डॉक्टर म्हणून ओळखत असत कन्नड परिसरामध्ये ते प्रसिद्ध डॉक्टर म्हणूनच ओळखले जात होते. प्रचंड प्रतिभाशक्ति लाभलेले दी.सा. हे साहित्यिकही होते. स्वता:ची पदरमोड करून सायकलवरुन कन्नडला येऊन प्रेसमधून पुस्तके छापून घेत असत. जानेवारी 1968 मध्ये सत्कारकाव्य नावाचा ग्रंथ न्यु अशोक प्रिंटिग प्रेस मधून छापून घेतले होते. गुरुवार पंचपदी, श्री. मुक्तानंद नमन सप्तश्लोकी, पूर्णाती भजन शत समेल्न उत्सव रंगारी देवगाव वृतांत दर्शन, जागृत बालाजी काव्य विचार दर्शन, साक्षता ग्राम गौरव काव्यदर्शन, श्री. गिरजा देवी स्तवन, भजनस्मृती, श्री.गुरुदेव दर्शन, स्फूर्ती गजानन, पिन्नाकेश्वर वंदन, लक्षचंडी, सहस्त्रचंडी, श्री.गोदावरीनंदन स्तोत्र महात्म्य, प्रबोध पुष्पमाला, भारत सेवक समाज शिबीर दर्शन इत्यादी ग्रंथाची रचना केली. भारत सेवक समाज और्ंगाबाद जिल्हा संयोजक म्हणूनही त्यांनी कार्य केले आहे.

उत्कृष्ठ साहित्यरचने मुळे त्यांना अ.भा. श्री. छत्रपती शिवाजी महाराज साहित्य स्पर्धा समितिने 1979 मध्ये शिवजयंती निमित्ताने घेतलेल्या स्पर्धेत श्री शिवाजी महाराज आर्यावृत या त्यांच्या साहित्यकृती बद्दल प्रशस्ती पत्र दिले आहे. तर 1980 मध्ये त्यांना प्रथम श्रेणीतील विजयी स्पर्धक म्हणून प्रशस्ती पत्रक दिले आहे.

स्वात्ंत्र्य चळवळीतील सहभागा बरोबरच सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक कार्यातही उल्लेखनीय कार्य दी.सा. कुलकर्णी यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे. ज्या काळात सुविधांचा अभाव होता अशा स्थितीत त्यांनी केलेली समाजसेवा ही महत्वपूर्ण होती. तत्कालीन समाजाचे चित्रण त्यांनी रचलेल्या साहित्यातून होते.

**बाजीराव तोताराम जाधव**[६] यांचा जन्म पिशोर येथे साधारणत: १९२०ते १९२५ च्या दरम्यान झाला असावा. निजामाच्या राजवटीतील ७ वी पर्यंतचे शिक्षण झाले होते. मराठा कुटुंबात जन्मलेल्या बाजीरावांची आर्थिक परिस्थिती बऱ्यापैकी होती. गावामध्ये सर्व जाती-धर्माचे लोक राहत होती. परंतु मुस्लिम शासक असल्यामुळे मुस्लिम धर्मीय लोकांना झुकते माप होते. बाजीरावांनी मुस्लिमांचा कधीही द्वेष केला नाही, स्वातंत्र्या नंतरही मुस्लिमांविषयी सहानुभूती ठेवली पाहिजे असे त्यांचे विचार होते. अधिकाऱ्यांकडून धार्मिक छळ केला जात असला तरी फकीर व गरीब मुस्लिमांना सांभाळण्याचे कार्य त्यांनी केले.

दिघी बॉर्डर कॅम्प संदर्भामध्ये माणिकचंद पहाडे व मिश्रीलाल पहाडे या दोघांच्या कार्याचा उल्लेख करून याच काळात त्यांच्या प्रमाणे गावातील व्यापारी मुस्लिमांना हाकलून लावण्याचे कार्य केले होते अशी माहिती त्यांनी दिली आहे. क्रांतिवीर काकासाहेबांचे सहकारी म्हणून त्यांनी अनेकदा काका साहेबांना मदत केल्याची माहिती सांगितली. गावांमधील लोहार हत्यारे तयार करून देत होता, बाजीराव जाधव यांची आई लोहाराला पैसे देत असत. तलवारी बरोबरच काठ्या व गोफणी याचा वापर ही रजाकारी सैन्याला मारण्यासाठी करण्यात येत होता अशी माहिती त्यांनी दिली. मुबारक चाऊस जमादार असल्याचा उल्लेख करून त्याच्या कडून प्रजेवर अत्याचार होत होते असे संगितले.

मुक्तिसंग्रामानंतर गावामध्ये काही वाद झाल्यास तेव्हाच मिटवण्याचे कार्य गावातील प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून बाजीराव करीत असत. अशा या स्वातंत्र्यसेनानी ची स्वतंत्र भारत सरकारकडून फक्त नोंदणी झाली आहे परंतु कसल्याही प्रकारची सरकारकडून मदत झालेली नाही.

**सखाराम सुपडुजी डहाके**[७] यांचा जन्म साधारणतः 1920 च्या सुमारास झालेला असावा. सेफियाबाद म्हणजे पिशोर मधीलच एक भाग आहे येथे ते राहत असत. त्यांच्या आईचे नाव काळाबाई हौसाजी पाटील ह्या याच गावातील होत्या. गावामध्ये शाळा होती, शिक्षणाची सोय होती, परंतु त्यांचे शिक्षण झालेले नाही आर्थिक परिस्थिती हालाखीची होती आणि कुटुंबाची असलेली जबाबदारी यामुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही असे असले तरी काकासाहेबांचे सहकारी म्हणून त्यांनी अनेकदा काकासाहेबांना मदत केली आहे. शहानुर रजाकार संदर्भामध्ये काकासाहेबांना त्यांनी मदत केली होती त्यांच्या सोबत काम केले होते अशा प्रकारची आठवण त्यांनी सांगितली. त्यावेळेस काळुजी पाटील मोकाशे हे गावचे पोलिस पाटील होते तर तात्या मामा हे पटवारी होते असे त्यांनी सांगितले.

## सारांश

हैद्राबाद मुक्तिसंग्रामामध्ये मराठवाड्यातील इतर भागाप्रमाणे कन्नड तालुक्यातही निजामाच्या राजवटी विरुद्ध स्वातंत्र्याचा लढा उभारला होता. कन्नड तालुक्याला लागूनच ब्रिटिश शासनाचा अमल होता. त्यामुळे ब्रिटिश राज्यातून निजामच्या विरोधात लढा उभारण्यात आला होता. निजाम हद्दीतूनही मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्याचा संग्राम उभारण्यात आला. कन्नड तालुक्यामध्ये याचे नेतृत्व काकासाहेब देशमुखांनी केले. स्वातंत्र्यानंतरही काकासाहेबांनी विधानसभे सदस्य महणूनही नेतृत्व केले होते. त्यांच्या सोबतच अनेकांनी या स्वातंत्र्य संग्रामात सहभाग घेतला होता. त्यापैकी नेमिचंद पाटणी, दि.सा. कुलकर्णी, बाजीराव जाधव व सखाराम डहाके यांच्या कार्याविषयीची माहिती थोडीशी मिळते. परंतु असे अनेकजन होते की केवळ त्यांची नावेच उपलब्ध आहेत. त्यांच्या विषयीची अधिकची माहिती मिळाल्यास खऱ्या अर्थाने कन्नड तालुक्यातील स्वातंत्र्य संग्रामाची माहिती स्पष्ट होते.

## संदर्भ


१. कन्नड शहरातील मराठवाडा मुक्तिसंग्राम शिलालेख.
२. भोसले अच्युत वि.- लोकराजा –मराठवाडा मुक्तिसंग्रामातील सशस्त्र क्रांतीचा नेता-
३. नेमिचंद फुलचंद यांच्याकडून मिळालेली यादी.
४. प्रत्यक्ष मुलाखत 13 जून 2013
५. मिश्रीलाल पहाडे यांनी दि.७ जून १९८४ रोजी गोविंद भाई (चेअरमन स्क्रिनिग कमिटी-हैदराबाद फ्रिडम स्ट्रगल) यांना दिघी कॅम्प प्रमुख म्हणून दिलेला अहवाल. झेरॉक्स प्रत डॉ. रमेश सूर्यवंशी यांच्या कडून प्राप्त.
६. प्रत्यक्ष मुलाखत 24 एप्रिल 2013
७. प्रत्यक्ष मुलाखत 24 एप्रिल 2013